**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०१/०३/२०१८

## दिंडोरी येथील कृष्णा ट्रेडींग कंपनीत चोरी करणारे चोरटे स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात सुमारे ०५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

---

दिंडोरी तालुक्यतील रहिवासी श्री. कृष्णा गायकवाड, रा. इंदोरे यांचे दिंडोरी गावात नाशिक कळवण रोडवर कृष्णा ट्रेडींग कपंनी नावाचे दुकान आहे. सदर दुकानात शेती उपयोगी अॅगल, तार, हार्डवेअर, सिमेंट इ. माल विक्रीसाठी ठेवण्यात आला होता, तसेच सदर मालाची ग्राहकांच्या मागणी प्रमाणे विक्री केली जाते यासाठी दुकानदार यांचे दिंडोरी येथील कुलकर्णी पेट्रोल पंपाजवळ गोडाऊन आहे. सदर गोडाऊन मधुन सुमारे ०६ महिन्यांपासुन कोणीतरी अज्ञात चोरटयांनी शेती कामकाज तसेच द्राक्ष बागांसाठी उपयोगी असणा-या तारांचे बंडल किं.रू. ४,९९,१००/- रू. चा माल चोरी केले बाबत दिंडोरी पो.स्टे. गुन्हा रजि.नंबर ४३/२०१८ भादवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर बाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाचा समांतर तपास सुरू होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व **अपर पोलीस अधीक्षक श्री. विशाल गायकवाड सो**. यांनी जिल्हयातील वाढत्या चो-या व घरफोडीचे गुन्हयांबाबत आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांचे पथकाने सदर गुन्हयांचा समांतर तपास सुरू केला. तसेच ग्रामीण भागातील शेती व द्राक्ष बागांसाठी लागणा-या तारांची तसेच अॅगलची चोरी करणारे गुन्हेगारांची गुन्हा करण्याची पध्दत व चोरीचा माल विकत घेणारे गुन्हेगारांची सविस्तर माहिती घेतली व त्यानुसार स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना गुन्हेगारांचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या. दरम्यान स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी हे दिनांक २८ फेब्रुवारी २०१८ रोजी दिंडोरी तालुक्यात सदर गुन्हयांमधील अज्ञात आरोपीतांचा शोध घेत असतांना पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे** यांना खब-यांमार्फत गुप्त बातमी मिळाली की, दिंडोरी तालुक्यात काही इसम चोरीच्या तारा कमी किंमतीचे दरात विक्री करीत आहे बाबत समजले, त्यावरून स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी दिंडोरी तालुक्यातील खतवड परिसरात पाळत ठेवुन **इसम नामे १) हेमराज कमलाकर महाले,** वय २४, रा. तळवाडपाडा, ता.दिंडोरी, **२) खंडेराव पुंजा साळुंके,** वय ३१, रा. खतवड, ता.दिंडोरी, **३) रमेश रंगनाथ रहेरे,** वय ३५, रा. दिंडोरी, ता.दिंडोरी, **४) भाउसाहेब यशवंत महाले, वय २५,** रा. तळवाडपाडा, ता.दिंडोरी यांना शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले वरील इसमांना

विश्वासात घेवुन सखोल विचारपुस करता त्यांनी दिंडोरी येथील कृष्णा ट्रेडिंग कंपनीचे गोडाऊन मधुन शेतीसाठी उपयुक्त असणा-या तारांचे बंडल **चोरी केल्याची कबुली** दिली आहे.

वरील ताब्यात घेतलेले आरोपी हे कृष्णा ट्रेडिंग कंपनी मध्ये गोडाऊन किपर म्हणुन काम करत होते व ते सुमारे ०६ ते ०७ महिन्यांपासुन गोडाऊन मध्ये विक्रीसाठी ठेवलेल्या शेतीउपयोगी तारा चोरी करून कमी किंमतीचे भावात विक्री करत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. सदर चोरीचा माल विकत घेणारा त्यांचा साथीदार नामे **५) रावसाहेब निवृत्ती मुळाणे**, वय ३५, रा. खतवड, ता.दिंडोरी यास स्थागुशाचे पथकाने ताब्यात घेतले असुन पुढील तपास चालु आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांचे कब्जातुन वरील गुन्हयात चोरीस गेलेले व्हेरिटेज इन्डस्ट्रिज प्रा. लि. कपंनीची, सिस्टेमॅटिक नावाचे **७३ तारांचे बंडल एकुण ५,७७३ किलो ग्रॅम वजनाचे सुमारे ४ लाख ९३ हजार रू. किंमतीचा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला असुन वरील आरोपी व जप्त मुद्देमाल दिंडोरी पोलीस स्टेशनचे ताब्यात देण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सा़ो,** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सा़ो** यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक **श्री. अशोक करपे,** पोउनि श्री. मच्छिंद्र रणमाळे, सपोउनि रवि शिलावट, पोहवा दिपक आहिरे, गणेश वराडे, पुंडलिक राउत, दत्तात्रय साबळे, नामदेव खैरणार, संजय गोसावी, जे.के.सुर्यवंशी, पोना अमोल घुगे, पोकॉ विश्वनाथ काकड, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम अशांचे पथकाने सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.